सत्यं शिवं सुंदरम्    दिनांकः– ७-३-२००५

श्री. हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर.

एम.ए. व्दितीय वर्ष(मराठी)

शैक्षणिक वर्ष २००४-२००५

## 'अभिप्राय'



प्रति,

प्रा.म.ई.तंगावार

मराठी विभाग

आदरणीय तंगावार सर, तुमच्याबद्दल च्यार शब्द लिहावं म्हटलं तर नेमकं काय लिहावं याबद्दल अनेक प्रश्न माझ्यासमोर उभे राहतात. तुम्ही मला घडवणारे एक शिक्षक तर आहातच. पण या ठिकाणी मी माझे मत नोंदविण्यासाठी तुमच्या सोबत मैत्रीची भूमिका स्वीकारू इच्छितो!

सर, तुमचे अध्यापन अतिशय उत्कृष्ठ आहे. नेमका विषय, आशय शिकवणे, विषयांतर न करता मुळ विषय नेमक्या शब्दामध्ये सांगण्याची शैली अतिशय परिणामकारक आहे. तसेच तुम्ही इतरत्र म्हणजे संगीत कलेचे चाहते आहात. तो गुणही मला आवडला.

" आनंद या जीवनाचा सुगंधापरी दरवळावा "

हे तुमचे आवडते गीत अर्थातच जीवनाला आनंदी करून सोडणारे आहे. तुम्ही सर्वांसोबत मिळून - मिसळून, विद्यार्थ्यामध्ये एक विश्वास निर्माण करून राहता. म्हणजेच यातून तुम्ही व पर्यायाने 'मी' आम्ही तुमच्यासोबत जीवनाचा आनंद घेतलो.

"शिक्षकाचे यश विद्यार्थ्यामध्ये दिसते." असे म्हणतात. सर, तुमच्या अध्यापनामधून प्रेरणा घेऊन मीही अभ्यास करण्याचा प्रयत्न करीत आहे. माझ्या जीवनाला घडवण्यात, वळण देण्यात तुमची निर्मळ, स्वच्छ वागणुक व तुमच्या अध्यापनाचे सहकार्य आहे. सर, खरं पाहीलं तर मी एम.ए. नियमित उपस्थित राहून करणार नव्हतो. पण आदरणीय लोंढारे सर व तुमच्या परिणामकारक अध्यापनामुळेच मी "येथे राहीलो.

" विद्यार्थी हा शिक्षकाचा परिक्षक असतो." या भूमिकेतून मी तुम्हाला सुचवू इच्छितो की, तुम्ही अध्यापन करते वेळी एकाच ठिकाणी उभा राहून शिकवू नका. कारण, म्हटले जाते की, 'Teacher is actor' 'शिक्षक हा कलावंत कलाकार असतो' त्यामुळे अध्यापनात व मुळ विषयात अधिक भरीवपणा आणण्यासाठी हावभाव, आशयानुरूप हातवारे व आवाजात चढउताराची आवश्यकता असते. (क्षमस्व.) अनुभवानुसार हाही प्रयत्न तुम्ही करालचं पण आतापासूनच सराव असणे आवश्यक आहे.

कृपया मागे पहा.

सर, तुम्ही ज्या महाविद्यालयात शिकवाल तेथील मराठी विभागाचे नावलौकीक तुम्हीच वाढवू शकता. एवढा मला विश्वास आहे.

सर, तुम्ही मला या दोन वर्षात अध्यापनातून व इतर वेळी जी ज्ञानाची शिदोरी दिली आहे त्याच्या आधार घेवुन मी माझे यशस्वी जीवन जगण्याचा प्रयत्न करीन. आणि आपल्या 'माय मराठीच्या' प्रचार प्रसारकरण्यासही मदत करीन.

सर, 'अक्षरगाणीसाठी मी एक कविता लिहली होती. अर्थातच कविता लिहण्याचा तो माझा पहिला प्रयत्न होता. व त्या कवितेचं नाव होतं 'स्वप्नातलं स्वप्न'. ही कविता भितीपत्रकावर प्रकाशित होईल अशी अपेक्षा होती. मात्र ते 'स्वप्नच' राहुन गेलं. 'त्या वेळेस चावी हरवली होती'. पण सर त्यासाठी कर्तव्यदक्षता बाळगणं, 'चावी' सांभाळण्याचं गांभिर्यही तितकंच महत्त्वाचं आहे! असो.... कारण हेही तितकंच खरं आहे की, स्वप्न हे शक्यतो दैनंदिन जीवनात महत्त्वाचे नसतातच.

सर मी फारच भरकटलो की काय? त्यामुळे मी क्षमा मागतो. सर, तुमचे भावी आयुष्य प्रयत्नातून यशस्वी व्हावे. अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. सर तुमची आदरयुक्त भिती वाटत होती आणि नेमके काय लिहावे हे सूचत नव्हतं. त्यामुळे 'मैत्री' या भूमिकेशी तटस्त राहून चार शब्द लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. माझ्याकडून काही गैरवर्तणुक झाली असेल तर क्षमा करणे.

" म्हणे श्रीगुरुंचे भुषण । आपण मी होईन ।
आणि दास होऊनि करीन । दास्य तेथिंचे ॥ "

" शिवतलें गुरुचरणीं । भलतैसें हो पाणी ।
तया सकळ तीर्थें आणी । त्रैलोक्यीचीं ॥ "

" गुरु क्षेत्र गुरु देवता । गुरु माता गुरु पिता ।
जो गुरुसेवेपरौता । मार्ग नेणे ॥ "

" बाळ बापाचां ताटीं रिगे । रिघोनि बापातें चि जेवऊं लागे ।
कि तो संतोषाचेनि वेगे । मुख ओडवी ॥ "



आपला आज्ञाधारक
स्वाक्षरी – [illegible] दि. १०/०३/०५

विद्यार्थ्यांचे नाव – सावरे विलास भाऊराव

पूर्ण पत्ता –
मु. पो. हलगरा
ता. निलंगा
जि. लातूर